महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य संचालनालय
जुने सचिवालय, पहिला मजला, विस्तार भवन, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२
वेबसाईट- www.mahasanskruti.org ई-मेल- mahaculture@gmail.com
दूरध्वनी क्र- ०२२: २२८४२६७०/३४, २२०४३५५०/७१

---

क्रमांक:सांकासं/आस्था-२/२७५२ दिनांक: २२.०५.२०२४

## जाहिर निवेदन

**विषय: सांस्कृतिक कार्य संचालनालयातील CCTV यंत्रणा देखभाल/दुरुस्ती करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत.**

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सांस्कृतिक कार्य संचालनालय या कार्यालयातील CCTV यंत्रणा देखभाल/दुरुस्ती साठी सेवा पुरवठादार यांच्याकडून सोबत जोडलेल्या नमुना सूचनापत्र अटी व शर्तीच्या अधीन राहून दिनांक २२ मे २०२४ ते ०३ जून, २०२४ या कालावधीसाठी देखभाल/दुरूस्तीसाठी दरपत्रके मागविण्यात येत अहेत.

तरी इच्छुक कंपन्या, व्यक्ती यांनी आपले दर नमुन्याबंद लिफाफ्यात उक्त नमूद कालावधीत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात सादर करावेत. कार्यालयीन वेळेनंतर प्राप्त झालेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत. सर्व दरपत्रकातील दर भरताना सर्व कर अंतर्भूत करुन दर भरण्यात यावेत.

प्राप्त दरपत्रके कोणत्याही कारणाशिवाय स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार मा.संचालक, सांस्कृतिक कार्य यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

s/d
सहायक संचालक
सांस्कृतिक कार्य संचालनालय,मुंबई

# सांस्कृतिक कार्य संचालनालयातील CCTV यंत्रणा देखभाल/दुरुस्ती करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत.

<u>अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.</u>

सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई येथील CCTV यंत्रणा देखभाल दुरुस्तीसाठी वार्षिक करार पुरवठा/कार्यारंभ आदेशाच्या दिनांकापासून एक वर्ष या कालावधीसाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून दर करार करण्यात येईल.

(१) CCTV यंत्रणा देखभाल दुरुस्तीची कामे ही सेवा पुरविण्यासाठीचे दर हे पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून एक वर्ष या कालावधीसाठी अंमलात राहतील. शक्य झाल्यास सदर कराराला शासन नियमानुसार मुदत वाढ देणे आवश्यक असल्यास मुदत वाढ देण्यात येईल व मुदतवाढ कालावधीमध्ये स्वीकृत झालेल्या दरानेच अदायगी केली जाईल. सदरची मुदतवाढ स्वीकृत दराने स्वीकारणे हे सेवापुरवठादार यांच्यावर बंधनकारक राहील.

(२) CCTV यंत्रणा देखभाल दुरुस्तीची दरपत्रके दाखल करतांना कार्यालयात बसविण्यात आलेल्या CCTV यंत्रणेची पाहणी करून दर नमूद करावेत.

(३) CCTV यंत्रणेअंतर्गत बसविण्यात आलेल्या साहित्य नैसर्गिक आपत्ती/अथवा शोर्ट सर्किट इत्यादी कारणांमुळे खराब किंवा नादुरुस्त झाल्यास कार्यालयाकडून खरेदी करण्यात येईल.

(४) सदरील दरकरार हा CCTV यंत्रणा देखभाल दुरुस्तीसाठी असून यामध्ये लागणा-या साहित्याचा समावेश राहणार नाही.

(५) सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई हे कार्यालय राज्यातील मुख्य कार्यालय असल्यामुळे या कार्यालयात राज्यातील मा. मंत्री महोदय व वरिष्ठ अधिकारी, ज्येष्ठ कलावंत, कलाकार, पत्रकार, नागरिक, राजकीय पक्षाचे प्रतिनिधी हे विविध कामासाठी भेटी देत असतात त्यामुळे CCTV यंत्रणा नेहमी कार्यान्वित राहणे आवश्यक राहील.

(६) CCTV यंत्रणेत काही बिघाड झाल्यास त्याची सूचना आपणास दूरध्वनीद्वारे देण्यात येईल. सूचना प्राप्त होताच २४ तासाचे आत दुरुस्ती करणे बंधकारक राहील.

(७) जर CCTV यंत्रणेच्या दुरुस्ती/देखभालची कामे वेळेत केली जात नसेल, कामात चालढकल करत असेल, अथवा समाधानकारक काम करत नसेल तर हे कार्यालय कोणतीही पूर्वसूचना न देता करार रद्द करण्यात येऊन सुरक्षा अनामत रक्कम व प्रलंबित देय देयकाची रक्कम सर्व रक्कम जप्त करण्यात येईल, तसेच सदर निविदाधारकाचे नाव काळ्या यादीत (Black List) टाकण्यात येईल याबाबत निविदाधारकाची काहीही उजर राहणार नाही.

(८) CCTV यंत्रणेची तपासणी दर पंधरा दिवसाने करून त्याबाबतचे अहवाल लेखी स्वरूपात सहसंचालक, सांस्कृतिक कार्य यांना सादर करणे बंधनकारक राहील.

(९) कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७०, महाराष्ट्र कंत्राटी नियम १९७१, व इतर सर्व कामगार/औद्योगिक कायद्याचे पालन करण्याची व त्यानुसार आवश्यक ते अभिलेखे विहित नमुन्यात ठेवण्याचा व विवरणपत्रे इत्यादीबाबत वेळेचे वेळी पूर्तता करण्याची जबाबदारी सेवापुरवठादार यांची राहील

(१०) कार्यालयातील किंवा कार्यालयीन परिसरातील कोणत्याही सामानाची चोरी, लपवालपवी होणार नाही हे पाहणे ठेकेदाराची जबाबदारी राहील व असे काही झाल्यास याची सर्व जबाबदारी सेवापुरवठादार यांची राहील. .
(११) निविदाधारकाने नियुक्त केलेल्या कामगार/कर्मचारी यांचेकडून गैरवर्तन अथवा कार्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास सेवापुरवठादार यांचेकडून नुकसान भरपाई घेण्यात येईल.

(१२) CCTV यंत्रणा देखभाल व दुरुस्ती देयक सहसंचालक, सांस्कृतिक यांचे काम समाधानकारक केल्याबाबतच्या अभिप्रायासह प्रतीमहा देयक अभिलेखपालामार्फत लेखा शाखेत प्रत्येक सहामाही संपल्यावर ५ तारखेपूर्वी सादर करावे लागेल. कार्यालयीन आर्थिक तरतुद उपलब्ध राहील त्याप्रमाणे देयके मंजूर करून प्रदान करण्यात येईल.

(१३) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर सर्व अटी व शर्तीची पूर्तता करण्याचा करारनामा रुपये १००/- चे बॉडवर दोन दिवसाच्या आत करून द्यावा लागेल.

(१४) सदरील दरकरार कराराच्या कालावधीमध्ये कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहे. कोणतीही नोटीस न देता करारनामा रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही उजर चालणार नाही...

(१५) वरील सर्व अटी व शर्ती मध्ये नवीन अटी व शर्तीचा समावेश करणे, अटी व शर्ती कमी करणे तसेच परिस्थितीनुसार त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार संचालक, सांस्कृतिक कार्य यांनी राखून ठेवले आहे...

वरील सर्व अटी व शर्ती विचारात घेऊन सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई या कार्यालयातील CCTV यंत्रणा देखभाल दुरुस्तीसाठी करण्याबाबतचे दरपत्रक दि. ०३ जून २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (शासकीय सुट्टया सोडून) मोहोरबंद लिफाप्यात संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, पहिला मजला, जुने सचिवालय, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२ येथे पाठवाव्यात किंवा प्रत्यक्ष जमा करावीत. मुदतीनंतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत, सदर दरपत्रके याची कृपया नोंद घ्यावी.

s/d
**सहायक संचालक,**
**सांस्कृतिक कार्य संचालनालय,मुंबई**

दिनांक: २२.०५.२०२४
ठिकाण: मुंबई

# सुचना

## CCTV यंत्रणा देखभाल/दुरुस्ती

| अ.क्र. | बाब | संख्या | एकूण रक्कम सर्व करांसहित |
|---|---|---|---|
| १. | सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई येथील सी.सी.टी.व्ही.यंत्रणा देखभाल दुरुस्तीसाठी | ०७ | |

तरी इच्छुक कंपन्या, व्यक्ती यांनी आपले दर नमुन्याबंद लिफाफ्यात दिनांक २२ मे, २०२४ ते ०३ जून, २०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात सादर करावेत. कार्यालयीन वेळेनंतर प्राप्त झालेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

सर्व दरपत्रकातील दर भरताना सर्व कर अंतर्भूत करुन दर भरण्यात यावेत.

प्राप्त दरपत्रके कोणत्याही कारणाशिवाय स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार मा.संचालक, सांस्कृतिक कार्य यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

s/d
सहायक संचालक,
सांस्कृतिक कार्य संचालनालय,मुंबई

# नमुना

| अ.क्र. | बाब | संख्या | एकूण रक्कम सर्व करांसहित |
|---|---|---|---|
| १. | सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई येथील सी.सी.टी.व्ही.यंत्रणा देखभाल दुरुस्तीसाठी | ०७ | |

स्वाक्षरी:

नाव व पत्ता: